# मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड.

कार्यालयीन आदेश

(प्रशासन विभाग)

जा.क./ 1989 /2026
दिनांक : 29/04/2026

निम्नस्वाक्षरीकार यांचे असे निदर्शनास आले आहे की, प्रत्येक वेळी कारागृह भेटी दरम्यान आरोपी तोंडी तकार करतात की, त्यांना पोलीस बंदोबस्ता अभावी न्यायालयात हजर केले जात नाही.

सदर बाब ही मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे लक्षात आणुन दिल्यानंतर असे निर्देशीत करण्यांत आले आहे की, ज्यावेळी पोलीस बंदोबस्ता अभावी न्यायालयीन बंद्यांना न्यायालयात हजर केले जाणार नाही त्यावेळी त्यांना व्ही.डी.ओ. कॉन्फरन्सद्वारे त्यांची हजेरी घेण्यात यावी.

सबब, निम्नस्वाक्षरीकार हे न्यायाधीन बंद्यांना व्ही.डी.ओ. कॉन्फरन्सव्दारे हजर ठेवणे बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेत.

| अ. क | कामकाजाच्या तारखा | पदभार ठेवलेल्या न्यायालयांचे नाव व पदनाम |
|---|---|---|
| 1. | दिनांक 01 मे–2026 ते<br>दिनांक 15 मे–2026 | श्रीमती एम.एस.पठारे,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क. 2 बीड |
| 2. | दिनांक 16 मे–2026 ते<br>दिनांक 31 मे–2026 | श्री. आर.एस.ए.शेख,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क. 1 बीड |

टिप :

1. सबंधीत दिवशी नमूद न्यायीक आधिकारी जर कांही कारणास्तव मुख्यालयी हजर नसतील, सुटटीवर, रजवेर, उन्हाळी/हिवाळी सुटटीवर अथवा वैदयकीय रजेवर असतील तर त्यांचा कार्यभार ज्यांचेकडे सोपविला आहे ते न्यायीक आधिकारी व कर्मचारी वरील काम पाहतील.
2. सदर व्ही.सी. न्यायालयात उपलब्ध असलेल्या व्ही.डी.ओ. कॉन्फरन्स सुविधाद्वारे आपआपल्या न्यायालयात डायसवर घेण्यात यावी
3. सदर काम हे सकाळी 11.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत करावे.
4. फक्त बीड तालुका न्यायालयाच्या हद्दीत येणा–या (मुख्य न्यायदंडाधिकारी,बीड व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,बीड ) यांचे हद्दीत येणा–या न्यायाधीन बंदी यांचे काम पहावे
5. व्ही.सी. वर हजर राहणा–या आरोपींची माहिती संबंधीत न्यायालयास तात्काळ कळविण्यांत यावी.

सदरील आदेश दिनांक 01/05/2026 रोजीच्या माध्यान्हपुर्व पासुन लागु होतील.

आपला विश्वासू,

( प्रविण रा.शिंदे )
मुख्य न्यायदंडाधिकारी,बीड.

याची एक प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :

1. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, बीड यांचे सेवेत सविनय सादर.
2. मा. जिल्हा न्यायाधीश–1, बीड.
3. मा. सदस्य सचिव, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, बीड.
4. मा.जिल्हा सरकारी वकील, बीड.
5. मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड.
6. मा. 1 ले, 2 रे, 3 रे, 4 थे, 5 वे, 6 वे, 7 वे, 8 वे, 9 वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर तथा अति.मुख्य न्यायदंडाधिकारी बीड.
7. 1 ले, 2 रे, 3 रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,बीड
8. सहाय्यक सरकारी अभियोक्ता, बीड (खोली क.210)
9. अध्यक्ष, वकील संघ, बीड.
10. पोलीस ठाणे, बीड शहर, शिवाजी नगर, पेठ बीड, बीड ग्रामीण, पिंपळनेर, नेकनूर, सायबर
11. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड.
12. अधिक्षक, जिल्हा कारागृह वर्ग–2, बीड.
13. संगणक विभाग, बीड
14. लोक अभिरक्षक कार्यालय, बीड, (खोली क.136)
15. रिट विभाग, जिल्हा न्यायालय, बीड.
16. सुचना फलक.
17. कार्यालयीन संचिका.

( प्रविण रा.शिंदे )
मुख्य न्यायदंडाधिकारी,बीड.